# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/02/2024 (मंगळवार) सायंकाळ


---

### नागपूर ग्रामीण पोलीसांची वाहतूक केसेस बाबत विशेष मोहीम

नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हातंर्गत पोलीस स्टेशन मधील वाहतुक नियमन करणारे नियुक्त असलेले अधिकारी/अंमलदार व वाहतुक शाखा तर्फे वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्यां विरूध्द निरंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येते. वाढत्या अपघाताचे प्रमाण विचारात घेता व त्याचे विश्लेषण करून रस्ते अपघातांना आळा घालण्याकरीता अपघातास कारणीभुत ठरणाऱ्या कारणांवर विशेषत: लक्ष देवून त्याव्दारे दि. १२/०२/२०२४ रोजी मोटार वाहन अधिनियम अंतर्गत वेगवेगळी कारवाई करण्यात आली आहे. अपघातास कारणीभुत ठरणाऱ्यामध्ये मुख्यत: अवैध प्रवासी वाहतूक, विना हेल्मेट, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर करणे, दारू पिऊन वाहन चालविणे, वेगमर्यादे पेक्षा वाहन चालविणे, विना सिटबेल्टचा वापर करणे ईत्यादी प्रकारच्या शिर्षकाखाली विशेष मोहीम राबवुन खालील प्रमाणे कार्यवाही करून दंड वसुल करण्यात आला आहे.

वरिल शिर्षकाखाली विशेष मोहीम राबवुन नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हातंर्गत पोलीस स्टेशन व वाहतुक शाखा तर्फे करण्यात आलेल्या कारवाईमध्ये २६३ केसेस मध्ये रू. ८५०००/— दंड वसुल करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ साहेब यांचे मार्गदर्शनात वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक भिमाजी पाटील व इतर ठाणेदार यांनी व यांच्या स्टाफनी पार पाडली.

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कोंढाळी** :— फिर्यादी नामे— ब्रिजेशकुमार कुंजबिदार तिवारी वय ५० वर्ष, रा. कोंढाळी ता. काटोल जि. नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे अप. क्र. ६५५/१९ कलम ३०२, २०१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील मृतक नामे— रवि उर्फ रविंद्र गणेश मांजरेवार, वय ३१ वर्ष, रा. सावरगाव ता. नरखेड जि. नागपुर हा रस्त्याने जात असतांना यातील अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीने चालवुन मृतक याला ठोस मारल्याने मरण पावला. असे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून अप. क्र. ६५५/१९ कलम २७९, ३०४(अ) भादवि. सहकलम १३४, १८४ मो.वा.का. सदर गुन्हा नोंद करून तपासात घेतला. सदर गुन्हयाचे तपास दरम्यान नमुद **आरोपी नामे— राजेश नरेश चव्हाण, वय २३ वर्ष, रा. आलेसुर ता. कळमेश्वर जि. नागपूर** यास सदर गुन्हयात अटक करून आरोपीचा कबुली जबाब नोंद केला असता आरोपीने सांगितले की, गुन्हयातील मृतक व आरोपी हे दोघेही मित्र असुन एकाच टुव्हिलरवर जात असतांना यातील मृतक याने आरोपीस गाडी चालविण्या करीता दिले नाही. या कारणावरून आरोपीने गाडी थांबवुन हातात दगड घेवुन मृतकाचे डोक्यावर दगडाने मारून खुन केला व दगड दुर फेकुन पुरावे नष्ट केले. असे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात कलम ३०२, २०१ भादवि. कलम वाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि राम ढगे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्रीमती एच. सी. शेंडे मॅडम जिल्हा व सत्र न्यायाधीय नागपूर कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १३/०२/२०२४ रोजी मा. श्रीमती एच. सी. शेंडे मॅडम जिल्हा व सत्र न्यायाधीय नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३२४ भादवि. मध्ये नमुद आरोपीस ०३ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी घाडगे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोना पवन येवतकर पो.स्टे. कोंढाळी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**